# देवाच्या लोकांनी कोरड्या भूमीवरून तांबडा समुद्र पार केला.

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, तुझे वचन म्हणजे केवळ मनुष्यांच्या कल्पना नाहीत तर आमचा विश्वास हा महान ऐतिहासिक घटनांमधून उत्पन्न झाला आहे, हे शिकण्यास मुलांचे साहाय्य कर.''

मुलांना शिकविण्यासाठी कोणतीही कार्यकृती निवडा.

मोठ्या मुलाने वा शिक्षकाने मोशे तांबडा समुद्र ओलांडून जातो हा वृत्तांत वाचून दाखवावा किंवा आठवून सांगावा. महान अद्भुत चमत्काराच्याद्वारे देवाने आपल्या लोकांची गुलामगिरीतून कशी सुटका केली ते निर्गम अध्याय 14 आम्हाला सांगतो.

वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे)

- इस्राएल लोक मिसर देश सोडून गेल्यावर मिसरच्या लोकांनी त्यांना कोठे गाठले? (पाहा निर्गम 14:9)
- इस्राएल लोकांच्या वतीने लढण्याचे अभिवचन कोणी दिले? (पाहा वचन 14)
- त्या रात्री देवाने इस्राएल लोकांना मिसरच्या लोकांपासून कसे वेगळे केले? (पाहा वचने 19-20)
- मोशेने समुद्राच्या दिशेने आपले हात उभारले तेव्हा काय घडले? (वचन 21)
- इस्राएल लोकांनी तांबडा समुद्र कसा पार केला? (पाहा वचन 22)



नाट्यीकरण करा. तांबडा समुद्र पार करणे, निर्गम अध्याय 14.

- मुख्य उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून मुलांना ही नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा.
- मुलांकडून नाटिकेची तयारी करून घेण्यासाठी वेळ द्या.
- तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करून घेण्यासाठी मदत करावी.

मोठ्या मुलांनी वा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

**निवेदक** वृत्तांताचा सारांश तयार करून मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास साहाय्य करा.

**मोशे**- हातात एक मोठी काठी धरा.

**फारो**- याच्या डोक्यावर मुगूट म्हणून उलटे केलेले पोते ठेवा.

लहान मुलांनी पुढील भूमिका कराव्यात:

**मिसरचे सैन्य रथ म्हणून खुर्च्यात उभे राहा.**

**घोडे.** रथांच्या समोर ओणवे होऊन उभे राहा. घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज करा.

**इस्राएली लोक**- घाबरलेल्या चेहऱ्याने वावरा.

**मेंढरे** ओणवे होऊन चाला आणि तोंडाने मेंढरांचा आवाज काढा.

**तांबडा समुद्र**- पाण्याची भिंत दाखगिवण्यासाठी हात उंच उभारा.

**निवेदक:** निर्गम 14:1-20 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''फारो काय म्हणतो ते ऐका.''

**फारो:** ''सैनिकांनो, आपले इस्राएली गुलाम तर पळून गेले. तुमचे रथ तयार करा आणि त्यांचा पाठलाग करा!''

**मिसरचे सैन्य:** 'रथांवर' स्वार होऊन घोड्यांना चाबूक मारल्याचा अभिनय करा. घोड्यांना म्हणा, ''लवकर पळा! इस्राएली लोकांना गाठा. ते समुद्राच्या तीरावरच अडकले आहेत. तेथून त्यांची सुटका होणार नाही.''

**इस्राएली लोक:** मोठ्याने रडत म्हणा, ''आपण तर मोठ्या पेचात पडलो!'' ''आता आपण येथेच बुडून मरणार!'' ''देवा, आमची मदत कर रे!''

**मेंढरे:** मेंढरांचा आवाज करा.

**इस्राएली लोक:** ''ए, तो पाहा, देवाचा अग्नीस्तंभ आपण आणि मिसरचे सैन्य ह्यांच्या दरम्यान उभा आहे. आता रात्रीच्या अंधारात त्याना आपण दिसणारच नाही!''

**निवेदक:** निर्गम 14:21-31 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा.

**तांबडा समुद्र:** समुद्रातील वाट करण्यासाठी दोन दोनच्या ओळी करा.

**निवेदक:** ''मोशे काय म्हणतो ते ऐका.''

**मोशे:** तुमच्या हातातील काठी तांबड्या समुद्रावर उगारून म्हणा, ''प्रभू आमच्या बाजूने लढेल. पाहा वारा समुद्राचे पाणी बाजूला करीत आहे तुम्ही कोरड्या भूमीवरून पलिकडे जाल.''

**तांबडा समुद्र:** तुमचे हात उंच करा आणि उलटे उभे राहा.

**इस्राएली लोक व मेंढरे:** समुद्रातील रस्त्याने चालत जा दोन्ही बाजूंना पाहा इस्राएली लोक ओरडतात, ''बघा, बघा आपल्या दोन्ही बाजूंना पाण्याच्या कशा उंच भिंती उभ्या आहेत!'' मेंढरांनी आवाज करावा.

**फारो:** ''ते बघा वाऱ्यामुळे समुद्रातून रस्ता तयार झाला जा त्यांच्यामागून जा!''

**मिसरचे सैन्य व घोडे:** इस्राएली लोकांच्या मागे जा. सैनिक रथांतून खाली उतरून त्यांच्या घोड्यांच्या मागून जातात. 'भर समुद्रात' असतांना ओरडा, ''अरे हे काय झाले?'' ''माझ्या रथाची चाके निखळली!'' ''माझा रथ रूतून बसला!'' ''पाणी येत आहे! आता आपण बुडणार!'' घोड्यांनी मोठ्याने खिंकाळून खाली पडावे व मरावे. मिसरचे सैनिक खाली पडतात आणि मेल्यासारखे निपचित पडतात.

**तांबडा समुद्र:** मिसरचे सैन्य व घोड्यांवर पडा.

**इस्राएली लोक:** आमच्या देवाने त्याच्या महान सामर्थ्याने आमचे रक्षण केले!''

**निवेदक किंवा मुलगा :** नाटिका संपल्यावर मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल, तर त्यांना वर दिलेले प्रश्न प्रौढांना विचारण्यास सांगा.

**चर्चा करा.** प्रश्न आपल्या लोकांचे सैतानी शक्तीपासून कोणत्या मार्गांनी रक्षण करतो याची अन्य उदाहरणे मुलांनी सांगावीत.



रथाचे चित्र काढा. मुलांना ते काढायला सांगा. हे चित्र मुले उपासनेच्यावेळी मोठ्या माणसांना दाखवून देवाचे सामर्थ्य पृथ्वीवरील कोणत्याही सत्तेवर कशी मात करते हे यावरून समजते याचे स्पष्टीकरण करतील.

**पाठ करा.** फिलिप्पै 4:13

**कविता**- स्तोत्र 15:1,2 व 11 ही वचने तीन मुलांना प्रत्येकी एक अशी म्हणायला सांगा.

मोठ्या मुलांना, देवाने आपल्या लोकांची मिसरमधील गुलामगिरीतून कशी सुटका केली किंवा आज तो आमची पापाच्या तावडीतून कशी सुटका करतो याविषयी कविता, गाणी अथवा नाटिका लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना**: ''प्रिय प्रभु, तू महान आणि सामर्थ्यशाली आहेस. तू मिसरचे घोडे आणि स्वार ह्यांना समुद्रात फेकलेस. गुलाम म्हणून दु:खसहन करणाऱ्या तुझ्या लोकांची हाक तू ऐकून त्यांची सुटका केलीस. आमच्या प्रार्थना तू नेहमी ऐकतोस आबद्दल तुझे आभार मानतो.''

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net